**ठळक बातम्या**

- जनगणना २०२७ अंतर्गत राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी केली स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण/ पुण्यात सर्वाधिक नोंदणी

- नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी

- पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान आज प्रधानमंत्री स्वीडनला जाणार / महत्त्वाच्या विषयांवर करणार चर्चा

- चांदीच्या आयातीवर निर्बंध लागू

**आणि**

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुषांच्या दुहेरी गटात भारताला उपविजेतेपद

**<><><><><>**

जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा टप्पा पूर्ण झाला असून राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण केली आहे. १ मे ते १५ मे दरम्यान ही प्रक्रिया राबवली गेली. पुणे, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यातल्या नागरिकांनी स्वगणनेत सर्वाधिक सहभाग नोंदवला. पुण्यात १ लाख ५३ ५६८ कुटुंबांनी, मुंबई उपगनर जिल्ह्यात १ लाख २१ हजार ६८ आणि ठाणे जिल्ह्यात १ लाख १६ हजार ५१२ कुुटुंबांनी स्वगणनेची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. त्याखालोखाल मुंबई जिल्ह्यात ६१ हजार २९५ तसंच नाशिक जिल्ह्यात ५२ हजार ६६७ कुटुंबांची स्वगणनेत नोंद झाली. गडचिरोली जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे ३ हजार ६८८ कुटुंबांनी स्वगणना केली. गोंदिया जिल्ह्यात फक्त ३ हजार ८८१, नंदुरबार ६ हजार ९५७ तर वर्धा जिल्ह्यात ७ हजार ६१८ कुुटुंबानी स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण केली.

ज्या कुटुंबांनी स्व-गणना प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे, त्यांनी त्यांच्या भागात येणाऱ्या प्रगणकाला ‘H’ या अक्षराने सुरू होणारा ११ अंकी स्व-गणना ओळखक्रमांक द्यावा, यामुळे माहिती संकलन प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण होण्यास मदत होईल, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१७ मे २०२६ - रविवार

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयात, मुख्य न्यायाधीशांव्यतिरिक्त अन्य न्यायाधीशांच्या स्वीकृत संख्येत आधीच्या ३३ मध्ये वाढ करून आता ३७ करण्यात आली आहे. अर्थातच आता एकूण न्यायाधीशांची संख्या ३८ झाली आहे. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या अध्यादेश सुधारणा - २०२६  अंतर्गत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी याला मंजुरी दिली. यासंदर्भातील १९५६च्या अध्यादेशातली ही सुधारणा आहे.

<><><><><>

जागतिक आर्थिक आणि भूराजकीय स्थितीच्या पार्श्वभूमीवर परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारांमधून गुंतवणूक काढून घेण्याचा कल सुरूच असून या महिन्यात आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी बाजारातून २७ हजार ४८ कोटी रुपये काढून घेतले आहेत. वर्ष २०२६ मध्ये आतापर्यंत परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी जवळपास २ लाख २०हजार कोटी रुपये काढून घेतले आहेत. ही रक्कम २०२५ या वर्षापेक्षा अधिक असून २०२५ या संपूर्ण वर्षात हीच रक्कम १ लाख ६६ हजार कोटी रुपये होती, अशी माहिती  एनएसडीएलनं दिली आहे.

<><><><><>

सीबीएसई म्हणजेच केंद्रीय शिक्षण मंडळाने अभ्यासक्रमात तिसरी भाषा अनिवार्य केली आहे. येत्या १ जुलै पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून हा नियम लागू होईल. आता नववीपासून विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकाव्या लागतील, आणि त्यातल्या किमान दोन प्रादेशिक भारतीय भाषा असणं आवश्यक राहील. मात्र दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत तिसऱ्या भाषेचा पेपर नसेल असं सीबीएसईनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नीट प्रवेश परीक्षा २०२६चे पेपर फुटल्याप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयाने १४ दिवसांची सीबीआय कोठडी दिलीआहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयने सुरु केल्यानंतर पुण्यातून आरोपीला काल अटक केली होती. नीटचा जीवशास्त्राचा पेपर फोडण्यात मांढरे प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयने सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' कार्यक्रमातून येत्या ३१ मे रोजी रविवारी सकाळी अकरा वाजता जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असणार आहे.

या कार्यक्रमासाठी, नागरिकांना मोफत दूरध्वनी क्रमांक १८०० -११– ७८०० यावर आपले विचार आणि सूचना पाठवता येतील. तसंच, नरेंद्र मोदी ॲप आणि माय जी ओ व्ही ओपन फोरम च्या माध्यमातूनही माहिती पाठवता येऊ शकते. यासह १९२२ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन आणि त्यानंतर एस.एम.एस.वर प्राप्त लिंकद्वारेही आपल्या सूचना पाठवता येणार आहेत.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर असून, ते आज स्वीडन इथं भेट देतील. त्यांच्या दौऱ्याचा हा तिसरा टप्पा आहे. प्रधानमंत्री आज गुटेनबर्ग इथं स्वीडीश प्रधानमंत्री उल्फ क्रिस्टर्सन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. व्यापार, हरित स्थित्यंतर, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोन्मेष, संरक्षण, अंतराळ इत्यादी क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत यावेळी चर्चा होईल. युरोपीयन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन यांच्याबरोबर उभय नेते युरोपीय गोलमेज परिषदेलाही संबोधित करतील.

स्वीडननंतर प्रधानमंत्री नॉर्वे आणि जर्मनीला भेट देणार आहेत.
भारत- युरोपीय संघ मुक्त व्यापार करार झाल्यानंतर प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच युरोप दौरा आहे.

<><><><><>

चांदीच्या आयातीवर सरकारने निर्बंध घातले आहेत. सोन्याचा किंवा प्लॅटिनमचा मुलामा लावलेल्या चांदीच्या आयातीवरही निर्बंध लावल्याचं परकीय व्यापार महासंचालनालयानं अधिसूचनेद्वारे सांगितलं. याआधी सरकारने १३ एप्रिल रोजी मौल्यवान धातूंवरचं आयात शुल्क ६ टक्क्यावरून १५ टक्क्यापर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला होता.

<><><><><>

तिरुवनंतपूरम इथून दिल्लीला जाणाऱ्या राजधानी एक्स्प्रेसच्या वातानुकूलित डब्याला लागलेल्या आगीच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश रेल्वे मंत्रालयानं दिले आहेत. मध्य प्रदेशमधल्या नागदाजवळ आज पहाटे सव्वा पाचच्या सुमाराला या गाडीच्या

एका वातानुकूलित डब्याला आणि गार्ड डब्याला आग लागली. तेव्हा डब्यातली सुरक्षा प्रणाली तात्काळ कार्यरत होऊन गाडी थांबली, या घटनेत कुठलीही जीवितहानी झालेली नाही, अशी माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. दोन्ही डबे उर्वरित गाडीपासून वेगळे करण्यात आले. रेल्वेमध्ये आगीसंदर्भातल्या विविध प्रणालींचे लेखा परीक्षण करण्यात येत आहे.

<><><><>

बीड जिल्ह्याच्या माजलगाव तालुका कार्यक्षेत्रात विनापरवाना शेतमाल खरेदी विक्री करणाऱ्यांवर कारवाई होणार असल्याची माहिती बाजार समितीनं दिली आहे. तालुक्यातील काही ग्रामीण भागात अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी विक्री करत असल्याचा प्रकार घडत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार आहे. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने यासंदर्भात परिपत्रक जाहीर केले आहे.

<><><><>

आज 'वर्ल्ड हायपर-टेन्शन डे', म्हणजेच, जागतिक उच्च रक्तदाब दिवस साजरा होत आहे. उच्च रक्तदाबाविषयी जागृती निर्माण करणं, रक्तदाब प्रतिबंध, निदान आणि नियंत्रणासाठी वैयक्तिक, सामूहिक आणि आरोग्य यंत्रणा स्तरावर प्रयत्नांना चालना देणं, हे या दिवसाचं उद्दिष्ट आहे. 'रक्तदाबावर एकत्रितपणे नियंत्रण मिळवू: आपला रक्तदाब नियमितपणे तपासा, या सूप्त मारेकऱ्याला पराभूत करा', ही यंदाची या दिवसाची संकल्पना आहे.

<><><><>

जागतिक दूरसंचार आणि माहिती संघटन दिवस आज साजरा होत आहे. पॅरीस मध्ये १८६५ मध्ये आजच्या दिवशी' आयटीयू', अर्थात आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाची स्थापना झाली, त्या निमित्त हा दिवस साजरा होतो. इंटरनेट आणि इतर माहिती आणि दूरसंवाद तंत्रज्ञानामुळे समाज आणि अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या बदलांबद्दल जागरुकता निर्माण करणं हे याचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

पुण्यात हडपसर इथे समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत नऊ पाण्याच्या साठवण टाक्यांचं लोकार्पण तसंच मुंढवा इथला महात्मा फुले चौक मेट्रो आणि दुमजली उड्डाणपुलाचं दूरस्थ

पद्धतीने भूमिपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. इंडोनेशियाच्या लिओ रोली कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन या जोडीनं त्यांचा २१ - १२, २५- २३ असा पराभव केला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमधे काल ईडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्सने गुजरात टायटन्सचा २९ धावांनी पराभव केला. त्यामुळे गुजरात टायटन्सच्या संघाची ‘प्ले ऑफ’ मधल्या प्रवेशाची संधी हुकली. सुनील नरिने सामनावीर ठरला.

धरमशाला इथं पंजाब किंग्जचा सामना रॅायल चॅलेंजर्स बंगळुरूबरोबर होईल. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. खेळ साडेतीन वाजता सुरू होईल.

दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॅायल्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होईल.

<><><><><>

इटालीयन खुल्या टेनिस स्पर्धेच्या काल झालेल्या अंतिम सामन्यात अमेरिकेच्या कोको गॅाफचा पराभव करत युक्रेनच्या एलिना स्वितोलिना हिने स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. स्वितोलिनाने कोको गॅाफचा ६-४, ६-७, ६-२ असा पराभव केला. स्वितोलिनाने तिसऱ्यांदा इटालीयन खुल्या टेनिस स्पर्धेत विजय मिळवला आहे.

पुरूष एकेरीत इटलीच्या यानिक सिनरने रशियाच्या दानिल मेदवेदेव याचा काल उपांत्य फेरीत ६-२, ५-७, ६-४ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत सिनरचा सामना आज कॅस्पर रूड याच्याशी होणार आहे.

//<><><><><>//